क्रमांक : ८६५४/क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: १७ जून, २०२०.

**संदर्भ:-** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२०/ प्र.क्र.०१/सचिव (व्यय), दिनांक ५ जून, २०२०.

**:: परिपत्रक ::**

कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी करण्यात केलेल्या लॉकडाऊन काळात राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. शासनाने निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती मर्यादित ठेवण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येत आहे. लॉकडाऊन कालावधीत काही शासकीय अधिकारी/कर्मचारी पूर्व परवानगी शिवाय गैरहजर असल्याचे व पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडून अन्य गावी गेले असल्याचे निदर्शनास आल्याने, कार्यालयातील कामाचे कर्मचारी निहाय समन्यायी वाटप होणेसाठी वित्त विभागाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. विभागाच्या सूचनानुसार कार्यवाही होण्यासाठी या सचिवालयात सर्व अधिकारी/कर्मचारी यांना पुढीलप्रमाणे अवगत करण्यात येत आहे:-

**(१) कोरोना प्रार्दुभाव/संसर्ग टाळण्यासाठी प्रत्येक कक्षाने प्रत्येक दिवसाची उपस्थिती न देता त्या-त्या आठवड्याचे रोस्टर व आठवड्यातील प्रत्येक दिवसाचा उपस्थिती/अनुपस्थिती अहवाल त्या-त्या आठवड्याच्या शुक्रवारी दुपारी १२.०० वाजेपर्यंत क-१ (आस्थापना) कक्षास पाठवावा.**

**(२) प्रत्येक कक्षाने त्यांच्या कक्षाशी संबंधित कामाचे स्वरूप / तातडी विचारात घेऊन कक्षातील प्रत्येक कर्मचारी आठवड्यातून किमान एकदातरी उपस्थित राहिल या प्रमाणे रोस्टरचे नियोजन करावे. कक्ष त्यांच्या आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांस एकापेक्षा अधिक दिवशी सुध्दा उपस्थित राहण्याबाबत आदेशीत करू शकतील. संदर्भाधीन परिपत्रकातील तरतूदीनुसार अनुपस्थितीसंदर्भातील कार्यवाही करण्यात येणार असल्याने, कक्षाने निर्देशित केलेल्या दिनांकास कार्यालयात उपस्थित राहण्याची दक्षता सर्व कर्मचाऱ्यांनी घ्यावी.**

...२/-



Scanned with CamScanner

(३) लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये या सचिवालयातील काही अधिकारी/कर्मचारी हे कार्यालयाच्या अनुमतीशिवाय गैरहजर असल्याचे निदर्शनास आल्याने, अधिकृतरित्या रजा मान्य करुन घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी उशिरात उशीरा सोमवार, दिनांक ८ जून,२०२० रोजी कार्यालयात उपस्थित राहून आपल्या उपस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा असे या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ८३४५/क-१, दिनांक २ जून, २०२० अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे रुजू अहवाल प्राप्त होत आहेत. परंतु, यापैकी काही रुजू अहवालावर संबंधित कक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कोणतेही अभिप्राय नोंदविलेले नसल्याचे आढळून आलेले आहे. कोरोना प्रादुर्भाव टाळण्यासाठी या सचिवालयातील बायोमॅट्रीक यंत्रणेवरील उपस्थिती नोंदविणे दिनांक १८ मार्च,२०२० रोजीपासून बंद करण्यात आलेली असल्यामुळे **विविध कक्षात कार्यरत अधिकारी/कर्मचारी हे कक्षाने सूचित केलेल्या दिनांकास कार्यालयात उपस्थित राहतात किंवा कसे, त्यांनी वरिष्ठांच्या पूर्वअनुमतीने रजा अथवा मुख्यालय सोडले होते किंवा कसे याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय रूजू अहवालावर नोंदविणेसाठी सदर अर्ज त्या त्या कक्षास परत पाठविण्यात येत असून संबंधित कक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उचित अभिप्रायासह सदरहू रूजू आस्थापना कक्षाकडे पाठविण्यात यावेत.**

(४) संदर्भाधीन शासन परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन **केवळ उपस्थिती कालावधीचेच वेतन आहरित करण्यात आल्याचे प्रमाणपत्र वेतन देयकास जोडणे अनिवार्य ठरविण्यात आले असून सर्व कक्षांकडून आस्थापना कक्षाकडे प्राप्त झालेली उपस्थिती/अनुपस्थितीची माहिती त्या त्या महिन्याच्या २२ किंवा २३ तारखेपर्यंत अथवा या दिनांकास कार्यालयीन सुट्टी असल्यास, या दिनांकाच्या अगोदरच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत आहरण व संवितरण अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येणार आहे. अत: सर्व कक्षांनी त्यांच्याशी संबंधित अधिकारी /कर्मचारी यांची उपस्थितीची माहिती मुद्दा क्रमांक (१) मध्ये विहीत केलेल्या दिवशी व वेळी पाठविण्याची खबरदारी घ्यावी.**

...३/-



Scanned with CamScanner

(५) या सचिवालयातील काही अधिकारी/कर्मचारी तसेच काही बाहेरील आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी मा.पीठासीन अधिकारी, मा.उप पीठासीन अधिकारी व दोन्ही सदनाचे मा.विरोधी पक्षनेते यांच्या आस्थापनेवर कार्यरत असतात. या मान्यवरांच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती/अनुपस्थितीचे अहवाल उपरोक्त प्रस्तावित कार्यवाहीसाठी क-१ (आस्थापना) कक्षाकडे पाठविण्याबाबत यथास्थिती मान्यवरांचे सचिव, खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी यांना या परिपत्रकान्वये विनंती करण्यात येत आहे.

मा.सचिव (कार्यभार) यांचे निदेशानुसार हे परिपत्रक काढण्यात येत आहे.

**( रचना र.परब )**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

७) संगणक कक्ष (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता)

८) निवडसूची.

D:\E drive\2020\CORONA 2020\16.6.2020.docx

Scanned with CamScanner